# नियमित दिवाणी दावा क्र. १६००११७/२०१४.

**बाजीराव वि. रामदास**

**नि. ६९ क्रमशः**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. २ राहूल चंद्रभाण जाधव यांचा पुढील सरतपास वकिल श्री. पी. डी. पवार यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

०१. मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र. ६९** लगत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. एस. डी. जाधव वकिल –</u>**

०२. माझे दहावी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझी जन्म तारीख १२/०८/१९९० आहे. माझ्या आत्याला वादीचा मुलगा संजय यांना दिले आहे व त्यांचे लग्न सण २००० मध्ये झाले आहे. माझ्या वडीलांचे पूर्ण नाव चंद्रभाण राजू जाधव आहे व आजोबांचे नाव राजू रतनसिंग जाधव आहे. माझ्या आजोबाला तिन बहिणी आहेत. त्यांची नावे कमळाबाई, अलकाबाई व मंदाबाई आहेत. त्यातील देवरगाव या गावी दोन मुलींना व एकिला पंचकेश्वर या ठिकाणी दिले आहे. देवरगाव येथील माझी आत्या कमळाबाई बाजिराव शिंदे जिवंत आहे. मी तिचे आधार ओळखपत्र दाखल करु शकतो. मी नबू धोंडी, छबू धोंडी व बाबू धोंडी यांना ओळखतो. हे मला सांगता येणार नाही की, नबू धोंडी, छबू धोंडी व बाबू धोंडी हे मयत बाजीराव व प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे मामा होते किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, बाजीराव बाळा शिंदे यांनी त्यांच्या मामाची मुलगी केली होती किंवा कसे. कमळाबाई आजोबाची बहिण असल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल करणार नाही. हे मला माहिती नाही की, मयत बाजीराव यांची पत्नी कमळाबाई ही नबू धोंडी यांची मुलगी आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सण २००० पूर्वी ते आत्या त्यांना देईपर्यंत आमचे शिंदे

कुटुंबासोबत कोणतेही नातेसंबंध नव्हते. माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे वकिलांनी लिहीला आहे. कमळाबाई माझी आत्या नाही. शपथपत्रात कमळाबाई माझी आत्या असल्याबाबत लिहीलेला मजकूर खरा नाही. माझ्या आजोबांनी खरेदीकरीता रक्कम कोणत्या सालात, किती दिली, कधी व कुठे दिली व क्षेत्र किती होते याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताच्या वेळी स्वतः हजर नव्हतो. गट क्रं. १९७ हा कोणाकडून खरेदी घेतला होता हे मला सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, मयत वादी व प्रतिवादी कधी विभक्त झाले ते साल सांगता येणार नाही. मी शपथपत्रात खरेदीखताबाबत लिहीलेला मजकूर ही माझी ऐकीव माहिती आहे. साक्षीदार सांगतो की, त्याला आजोबाकडून माहिती झाली. माझे वडील व आजोबा जिवंत आहे व ते शेती काम करतात. मयत वादी बाजीराव बाळा शिंदे यांचा शेती सोडून इतर कोणताही व्यवसाय नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मयत वादी बाजीराव हे सर्व भावांमध्ये मोठे व कर्ते पुरुष होते. मी गट क्रं. १९७ मध्ये शेवटी एक महिन्यापूर्वी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं. १९७ मध्ये घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या घरात प्रतिवादी क्रं. १ व २ राहतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींना रामदास व सदाशीव व्यतिरीक्त शिवाजी हा भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी हा नोकरीवर होता. हे मला माहिती नाही की, रामदास हा खेरदीविक्री संघ लासलगाव येथे नोकरीवर होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सण २०१४ च्या पूर्वी गट क्रं. १९७ मध्ये द्राक्षबाग होता. हे म्हणणे खरे आहे की, द्राक्ष बाग अर्धा रामदास व अर्धा सदाशीव यांचा होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यात असलेला द्राक्षबाग प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी तोडला आहे. हे मला सांगता येणार नाही की, शिवाजी बाजीराव शिंदे यांना आमच्या गावातील नबू धोंडी यांची मुलगी दिली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण चित्रा ही मयत बाजीराव याच्या मुलाला दिली असल्याने त्यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रं. १९७ खरेदीकरतांना माझे आजोबा राजू रतनसिंग जाधव यांनी पैसे दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे मला माहिती नाही की, गट क्रं. १९७ बाजीराव व त्यांचे भावाच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतीतून विकत घेतली आहे किंवा कसे. हे मला माहीती नाही की, वाटप

करतेवेळी सदर गट क्रं. १९७ प्रतिवादी क्रं. १ व २ यांना दिला आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**वा. दा. कबूल केले.**

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.07 18:25:14 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**चांदवड .**
**दिनांक ०७/०८/२०२५**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.08.07 18:25:19 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर,**
**चांदवड.**